**बिसेन डेन्टल केअर**
डॉ.दिप(पंकज) बिसेन डॉ.खुशबू बिसेन(पटले)
दंत व मुख रोगविशेषज्ञ
बी.डी.एस.(नागपूर)
ताज मेरीप्लेक्स, गर्ल्स कॉलेज रोड गोंदिया
सकाळी:- ११ ते ३ सायं ६ ते ९ वाजेपर्यंत संपर्क:- ९५४५६८१८७०

साप्ताहिक http://berartimes.com

# बेरार टाईम्स

मुख्य संपादक :- खेमेंद्र कटरे



गोंदिया शहरात बेरार टाईम्सचा अंक चौरसिया पान सेंटर जयस्तंभ चौक गोंदिया येथे उपलब्ध

आर.एन.आय.क्र. एमएएचएमएआर/२०११/४६५१० | वर्ष -१२ गोंदिया | अंक २१ | बुधवार,दि. ३ मे २०२३ | पृष्ठ-४ | किंमत-३ रुपये | Postal Reg.No.NPMFL/107/2022-2024

## राज्याच्या शेवटच्या गावात पोहोचले गृहमंत्री

■ सी-६० जवांनाचा गणवेश घालून पोलिसांशी व नागरिकांशी संवाद
■ गॅरापत्ती पोलीस मदत केंद्राचे उद्घाटन, हवाईपट्टी, मेडिकल कॉलेजच्या जागेची पाहणी



**गडचिरोली :-** आज महाराष्ट्र दिनी, राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी गडचिरोली जिल्ह्याला भेट दिली. ज्या ठिकाणी काल तीन नक्षल्यांना कंठस्नान घालण्यात आले, त्या नजिक असलेल्या दामरंचा आणि दुसरीकडे थेट छत्तीसगडच्या सीमेवर जाऊन देवेंद्र फडणवीस यांनी नागरिकांशी संवाद साधला. सी-६० जवानांचा गणवेश परिधान करुन एकप्रकारे मीही तुमच्यापैकीच एक आहे आणि तुमच्यासोबत आहे, असा संदेश उपमुख्यमंत्र्यांनी दिला आणि त्यांचा उत्साह वाढविला. त्यांचा सत्कारही केला.

दुपारच्या सुमारास त्यांचे गडचिरोली जिल्ह्यात आगमन झाले. प्रारंभी दामरंचा आणि नंतर ग्यारापत्ती या दोन्ही ठिकाणी त्यांनी पोलीस इमारतींचे उद्घाटन केले. दामरंचा हा गडचिरोलीचा अहेरी तालुक्यातील दक्षिणी भाग, तर ग्यारापत्ती उत्तर गडचिरोलीतील, थेट छत्तीसगडच्या सीमेवर. काल ३ नक्षल्यांना कंठस्नान घालण्यात आले, ते ठिकाण दामरंचा येथून ७-८ कि.मी. अंतरावर. त्याच भागात देवेंद्र फडणवीस यांनी दौरा केला. आपले जवान धोका पत्करुन काम करतात. त्यांचे मनोबल वाढविणे आणि नागरिकांशी संवाद साधणे, हाच त्यामागचा दुहेरी उद्देश. ग्यारापत्ती हे महाराष्ट्रातील शेवटचे गाव, तेथूनच छत्तीसगड सुरु होते. पण, पुढे ३५ कि.मी.पर्यंत कोणतेही पोलीस स्थानक नाही.

अतिसंवेदनशील भागात साधारणत: आमदारांच्या पलिकडे कुणी भेटत नाही, तेथे खुद्द देवेंद्र फडणवीस यांनी नागरिकांशी वैयक्तिक संवाद साधला. एसटीचा अर्ध्या तिकिटात प्रवास, शेतीच्या कोणकोणत्या योजना तुमच्यापर्यंत पोहोचतात, असे प्रश्न त्यांनी महिला, पुरुषांकडून विचारले आणि शासकीय योजनांबाबत त्यांच्याकडून माहिती जाणून घेतली. काही महिलांनी सध्या केवळ सकाळी आणि सायंकाळीच बस येते, दुपारी बस सुरु करा, अशी मागणी केली. त्यावर कार्यवाही करण्याचे आश्वासन उपमुख्यमंत्र्यांनी दिले. त्याचवेळी महिलांना अर्धे तिकिट आणि लेक लाडकी या योजनांचे महिलांनी स्वागत सुद्धा केले. आदिवासी बांधवांनी पारंपरिक पद्धतीने स्वागत केले.

गडचिरोली येथे देवेंद्र फडणवीस यांनी शहीद स्मारकाला अभिवादन केले. पोलीस अधीक्षक कार्यालयातील एकलव्य सभागृहात त्यांनी सी-६० च्या जवानांचा सत्कार केला. या नूतन सभागृहाचे सुद्धा उद्घाटन केले. दादालोरा खिडकी या नावाने एक योजना गडचिरोली पोलीस राबवित असून, शासकीय योजना सामान्य नागरिकांपर्यंत पोहोचविण्याचे काम गडचिरोली पोलीस करीत आहेत. या योजनेशी प्रशंसा करतानाच काही लाभांचे वितरण या दौऱ्यात उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते करण्यात आले.

### नक्षलवाद ही देशविरोधी लढाई...!



नक्षलवाद ही विचारांची नाही, तर आता देशविरोधी लढाई आहे. इतर परकीय शक्ती आणि आयएसआयसारख्यांची मदत या नक्षलवाद्यांना आहे. लोकशाही आणि संविधान न मानणाऱ्यांची ती लढाई आहे, असे देवेंद्र फडणवीस यांनी यावेळी माध्यमांशी बोलताना सांगितले.

या नक्षल कारवायांमध्ये सामान्य माणसांचे बळी गेले आहेत. आदिवासी, अनुसूचित जातीच्या लोकांचे बळी गेले आहेत. लोकहिताची, व्यापक विकासाला कायम नक्षल विचारधारेने विरोध केला आहे. त्यामुळेच एकिकडे या समस्येविरोधात लढणाऱ्या जवानांचे मनोबल उंचावण्यासाठी तर दुसरीकडे जनतेशी संवाद साधण्यासाठीच आपण येथे आलो आहोत. गडचिरोलीत यापूर्वीही मी दोन वेळा मुक्काम केला आहे आणि आजही मुक्काम करणार आहे. कदाचित गडचिरोलीत थांबणारा मी पहिलाच मुख्यमंत्री होतो, असेही पत्रकारांच्या प्रश्नांना उत्तर देताना ते म्हणाले.

आज शहरी नक्षलवादाची सुद्धा मोठी समस्या आहे. पोलीस भरतीला मोठा प्रतिसाद मिळतो आहे. जेव्हा स्थानिक स्तरावर नक्षलवाद्यांना यश मिळत नाही, तेव्हा ते लोकांचे ब्रेनवॉश करुन ही लढाई शहरांमध्ये लढू पाहताहेत. लोकशाही आणि संविधान न मानणे, हेच त्यांचे काम आहे. ही अराजकता आहे. गेल्या कालावधीत असेच एक मोठे नेटवर्क उद्ध्वस्त करण्याचे काम आम्ही केले होते, असेही फडणवीस यावेळी म्हणाले. गडचिरोलीत कनेक्टिव्हीटी वाढविण्याचे काम मोठ्या प्रमाणात होत आहे. सुरजागडच्या माध्यमातून मोठी गुंतवणूक येते आहे, असेही त्यांनी सांगितले.

## राष्ट्रवादी कॉंग्रेसच्या अध्यक्षपदावरून निवृत्त होण्याचा शरद पवारांचा निर्णय



**मुंबई :** राष्ट्रवादी कॉंग्रेसचे अध्यक्ष शरद पवार यांनी त्यांच्या "लोक माझे सांगाती' या राजकीय आत्मकथेच्या आवृत्तीच्या प्रकाशन कार्यक्रमात बोलताना मी राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाच्या अध्यक्षपदावरून निवृत्त होण्याचा निर्णय घेतला आहे, असे जाहीर केले आणि अवघा सभागृह स्तब्ध झाला.

शरद पवार म्हणाले, प्रदीर्घ कालावधीनंतर आता कोठेतरी थांबण्याचा विचार करणे आवश्यक आहे. १९९९ मध्ये राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाची स्थापना झाली, तेव्हापासून गेली २४ वर्षे राष्ट्रवादी पक्षाचा अध्यक्ष म्हणून काम पाहत आहे. सार्वजनीक जीवनातील १ मे १९६० पासून सुरू झालेला हा संपुर्ण प्रवास गेली ६३ वर्षे अविरत चालू आहे. त्यापैकी ५६ वर्षे मी कुठल्या ना कुठल्या सभागृहाचा सदस्य किंवा मंत्री म्हणून सातत्याने काम करत आहे. संसदेतील राज्यसभा सदस्यपदाची पुढील ३ वर्षे शिल्लक आहेत. या काळात राज्याच्या आणि देशाच्या प्रश्नांमध्ये अधिकाधिक लक्ष घालण्यावर माझा भर असेल, याशिवाय मी कोणतीही अन्य जबाबदारी घेणार नाही.सार्वजनिक जीवनातील १ मे, १९६० ते १ मे, २०२३ इतक्या प्रदीर्घ कालावधीनंतर आता कोठेतरी थांबण्याचा विचार करणे आवश्यक आहे. त्यामुळे मी राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाच्या अध्यक्षपदावरून निवृत्त होण्याचा निर्णय घेतला आहे. तथापि शिक्षण, शेती, सहकार, क्रीडा, सांस्कृतिक क्षेत्रात अधिक काम करण्याचा माझा मानस आहे. तसेच युवक, युवती व विद्यार्थी यांच्या संघटनांकडे आणि कामगार, दलित, आदिवासी व समाजातील इतर कमकूवत घटकांच्या प्रश्नांकडे माझे लक्ष राहिल," असे शरद पवार यांनी जाहीर केले.

शरद पवारांनी राष्ट्रवादी कॉंग्रेसच्या अध्यक्षपदावरून निवृत्त होत असल्याची घोषणा केल्यानंतर कार्यकर्ते भावूक झाले आहेत. अजित पवार यांनी सांगितले की, पक्षाची कमिटी जो निर्णय घेईल ते पवारांना मान्य असेल. परंतू कार्यकर्ते काहीही ऐकण्याच्या मनस्थितीत नाहीत. आज आणि आत्ता तुम्ही निर्णय मागे घ्या, असा अट्टहास सर्वांनी धरला आहे.

या निर्णयानंतर राष्ट्रवादी कॉंग्रेसचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील भावूक झाल्याचे बघायला मिळाले. यावेळी त्यांना अश्रू अनावर झाले. तर कमिटी आम्हाला मान्य नाही. तुम्हीच आमची कमिटी आणि सर्वस्व आहात, असे ठाम मत छगन भूजबळ यांनी व्यक्त केले.कार्यकर्ते आणि सर्व पदाधिकारी भावूक झाले आहेत आणि कार्यकर्ते हट्टाला पेटले असले तरी शरद पवारसाहेब काहीही बोलायला तयार नाहीत.

दरम्यान, या वृत्ताने महाविकास आघाडीच्या नेत्यांनाही मोठा धक्का बसला असून राज्यात सत्ताधाऱ्यांसह विरोधी पक्ष आणि राजकीय वर्तुळातील सर्वजण शरद पवार काय निर्णय घेतात, याकडे लक्ष लागले आहे.

**काय म्हणाले अजित पवार?**

शरद पवारांच्या निर्णयानंतर उपस्थित कार्यकर्ते आणि नेतेमंडळींना अश्रू अनावर झाले. सगळ्यांनी घोषणाबाजी केली. जयंत पाटील यांनी तर शरद पवारांनी निर्णय मागे घेतला नाही तर आपणही राजीनामा देऊ, असं जाहीर केलं. त्यानंतर पक्षातील इतर नेत्यांनीही अशाच प्रकारची भूमिका घेतली असताना अजित पवारांनी मात्र शरद पवारांच्या भूमिकेला पाठिंबा दर्शवला. तसेच, रडणाऱ्या कार्यकर्त्यांना खडसावत असताना त्यांनी शरद पवार यांच्या पत्नी प्रतिभा पवार यांच्याशी झालेल्या चर्चेचाही संदर्भ दिला.

**"शरद पवार अध्यक्ष नाही म्हणजे पक्षात नाही असं नाही"**

"सगळ्यांच्या भावना शरद पवारांनी ऐकल्या आहेत, पाहिल्या आहेत. तुम्ही गैरसमज करून घेताय. शरद पवार अध्यक्ष नाहीत म्हणजे पक्षात नाही असं नाहीये. आज कॉंग्रेसचे अध्यक्ष आहेत खर्गे, पण कॉंग्रेस चालतीये सोनिया गांधींकडे बघून.

**पान २ वर**

## वाघांची शिकार आणि १७ मिश्यांची तस्करीही

**लाखनी :** विदर्भात वाघांची संख्या वाढली तरी त्यांना असलेला शिकाऱ्यांचा धोका टळलेला नाही. शिकारीसाठी कधी वीजवाहिन्यांचा तर कधी विषप्रयोगाचा आधार शिकारी घेतात आणि मग वाघांच्या अवयवांची तस्करी केली जाते. अशीच एक तस्करी रोखण्यात वनखात्याला यश आले आहे. शिकार रोखता आली नसली तरीही ती करून अवयवांची विक्री करणाऱ्याला अधिकाऱ्यांनी अटक केली.

नागपूर व भंडारा वनखात्याने संयुक्त कार्यवाही करत वाघांच्या मिश्यासह तीन आरोपींना ताब्यात घेतले आहे. गेल्या काही दिवसांपासून खात्याला भंडारा येथे वाघाच्या मिश्यांची तस्करी होणार असल्याची माहिती मिळाली. अधिकारी यावर लक्ष ठेवून होते. त्यांनी सापळा रचून तस्करी करणाऱ्या तीन आरोपींना ताब्यात घेतले. यात अश्फाक शेख, प्रकाश मत्ते, रवींद्र बारई यांचा समावेश आहे. त्यांच्याकडून वाघाच्या १७ मिश्या जप्त करण्यात आल्या. आरोपींविरुद्ध वन्यजीव (संरक्षण) अधिनियम १९७२ च्या विविध कलमांद्वारे वनगुन्हा नोंदवण्यात आला.भंडारा वनविभागाअंतर्गत लाखनी वनपरिक्षेत्रात हा सापळा रचण्यात आला. ही कारवाई प्रादेशिकचे मुख्य वनसंरक्षक रंगनाथ नाईकडे, उपवनसंरक्षक भारत सिंह हाडा, उपवनसंरक्षक राहूल गवई यांच्या नेतृत्वाखाली विभागीय वनाधिकारी पी.जी. कोडापे, सहाय्यक वनसंरक्षक नरेंद्र चांदेवार, तसेच वनखात्याचे अधिकारी व कर्मचारी प्रमोद वाडे, य.द. ताडाम, निलेश तवले, गणेश जाधव, दिनेश पडवळ, विनोद शेंडे, सुधीर कुलरकर, संदीप धुर्वे, साकेत शेंडे यांनी केली.

## बँक खाते आधार क्रमांकाशी जोडण्याची सुविधा आपल्या गावातच

**गोंदिया-** प्रधानमंत्री किसान सन्मान निधी (झच घखडअछ) योजने अंतर्गत पात्र शेतकरी कुटुंबास दोन हजार प्रती हप्ता या प्रमाणे सहा हजार प्रती वर्षी लाभ देण्यात येतो. योजनेच्या १४ व्या हप्त्याचा लाभ जमा मे किंवा जून २०२३ मध्ये जमा होणार आहे. केंद्र शासनाने १४ व्या हप्त्याचा लाभ मिळण्यासाठी लाभार्थींनी त्यांचे लाभ जमा करावयाचे बँक खाते आधार क्रमांकास जोडणे बंधनकारक केले आहे.

राज्यात सद्यस्थितीत १२.९१ लाख लाभार्थींची बँक खाती त्यांच्या आधार क्रमांकास जोडलेली नाहीत, त्यामुळे या लाभार्थींच्या खात्यात १४ व्या हप्त्याचा लाभ जमा होणार नाही. लाभार्थींना त्यांचे बँक खाते आधार क्रमांकाशी जोडण्याची सुविधा त्यांच्या गावातील पोस्ट मास्टर यांच्यामार्फत उपलब्ध करण्यात आली आहे. यासाठी आधार कार्ड, मोबाईल क्रमांक या कागदपत्रांचे आधारे आपल्या गावातील पोस्ट विभागाचे कर्मचारी यांच्यामार्फत इंडिया पोस्ट पेमेंट बँकेत (आयपीपीबी) मध्ये खाते उघडावे. सदरचे बँक खाते आपल्या आधार क्रमांकाशी ४८ तासात जोडल्या जाईल. सदरची पद्धत कोणत्याही अतिरिक्त कागदपत्रांशिवाय करता येणार असल्याने अत्यंत सोपी व सुलभ आहे.

# मामा व लघु तलावांच्या सभोवताल अतिक्रमणाचा विळखा, उभारल्या इमारती

■ जमिनीच्या अकृषक रुपाने तलावाचे निस्तार होऊ लागले कमी
■ पायलट प्रोजेक्ट अंतर्गत प्राधान्यक्रमाने व्हायला हवी मामा तलावांची दुरुस्ती



**खेमेंद्र कटरे**

**गोंदिया:-** पुर्व विदर्भातील पाच जिल्ह्यात मालगुजारी तलावांचे वास्तव्य असून नागपूर वगळता चंद्रपूर, गडचिरोली, गोंदिया व भंडारा जिल्ह्यात या तलावांची संख्या मोठी असल्याने तलावांचे जिल्हे म्हणून ओळख आहे. मात्र या माजी मालगुजारी तलावांच्या निस्तारक्षेत्रात दरवर्षी होत असलेली घट चिंतनिय बाब ठरु लागली आहे. कुठे सिंचनायोग्य असलेल्या जमिनी अकृषक होऊन त्या बांधकामासाठी वापरल्या गेल्याने या तलावांचे निस्तारक्षेत्रच कमी झाले. कुठे कुठे तर पुर्णतःच निस्तारक्षेत्र बंद झाल्याने त्या परिसरातील तलावांचे सपाटीकरण करुन शासकीय इमारती तयार झालेल्या आहेत. तर काही ठिकाणी पांदणरस्ते, गावातील पाण्यासोबत गेलेला गाळ आणि शेतकर्यांनी हळूहळू तलावातील जागेवर अतिक्रमण करुन सुरु केलेला उपयोगामुळे या तलावांचे क्षेत्र कमी होऊ लागले हे सत्य समोर येऊ लागले आहे. शासनाकडे गेल्यावर्षभरापासून दुरुस्तीकरीता निधी मागणीचे प्रस्ताव सादर करुनही त्या प्रस्तावालाही अद्याप मंजुरी मिळालेल्या नाहीत.

### मालगुजारी तलाव पुनरुज्जीवण कार्यक्रम


**तत्कालीन अर्थमंत्री सुधीर मुनगंटीवर यांनी २०१५-१६ या आर्थिक वर्षासाठी १०० कोटी रुपये खर्च करण्याची तरतूदही केली होती. पूर्व विदर्भातील नागपूर, भंडारा, गोंदिया, चंद्रपूर आणि गडचिरोली जिल्ह्यात माजी मालगुजारी तलावांची संख्या ६ हजार ७३४ आहे. या तलावांचे पुनरुज्जीवण करुन जलसंकट दूर करण्याची योजना होती.या कामाला गती देण्यासाठी आता खास तीन वर्षांचे २०१६-१७, २०१७-१८, २०१८-१९ या आर्थिक वर्षांत पुनरुज्जीवणाचे काम करण्यात येणार होते.परंतु विशेष काही झाल्याचे दिसून येत नाही. त्यातच गोंदिया जिल्हा परिषदेच्या लघु सिंचन प्रकल्पातंर्गत ३ हजार ५५९ लघु सिंचन तलाव आहेत. त्यातील ३२४ तलाव व बंधारे नादुरुस्त आहेत. दुरुस्ती करण्याची नितांत गरज आहे. दुरुस्ती कामाकरिता शासनाकडे ५६ कोटी ८३ लाख रुपयांचा प्रस्ताव गेल्यावर्षी पाठविण्यात आला आहे. भंडारा जिल्ह्यातील तलावांच्या दुरुस्तीकरीता शासनाकडे प्रस्ताव सादर करण्यात आलेला आहे,मात्र अद्यापही त्या निधीला मंजूरी मिळालेली नाही.**

त्यामुळेच की काय गेल्या ४ वर्षापुर्वी या मालगुजारी तलावांच्या पुनरुज्जीवनासाठी विशेष मोहीम हाती घेण्यात आली होती. सदर मोहीम दोन वर्ष राबविण्यात आले, मात्र याकरीता जो आराखडा तयार करुन निधीची तरतूद करण्यात आली होती, तो निधीच देण्यात न आल्याने ही योजनाच बारगळली गेली. तेव्हापासून आजपर्यंत त्या योजनेवर पुर्नविचारच केला गेला नाही. ते नियोजन पुर्णत ढेपाळले गेले कारण प्रत्यक्ष जमिनीवर असलेल्या अधिकार्यांकडून सुचना न मागविता थंडगार कार्यालयात बसून तयार केलेला पुनरुज्जीवन आराखडा कागदोपत्री योग्य असला तरी तो प्रत्यक्षात दुरुस्तीच्यावेळी मात्र निरुपयोगी ठरला असेच म्हणण्याची वेळ आली आहे. सध्याच्या पुनरुज्जीवन आराखड्यासाठी जे मापदंड ठरविण्यात आले, ते योग्य नसल्याने पुर्व विदर्भातील मामा तलावांच्या दुरुस्तीचा प्रश्न दिवसेंदिवस गंभीर होत चालला आहे. त्याकरीता या मामा तलावांच्या पुनरुज्जीवनाचा कार्यक्रम हाती घेतांना तलावाच्या बुडीतक्षेत्रानुसार खोलीकरणाचे दर जोपर्यंत सरकार ठरवणार नाही, तोपर्यंत या तलावांचे पुनरुज्जीवन शक्य नाही.

### तलाव पुनरुज्जीवन कार्यक्रमावेळी स्थानिकस्तरावर आवश्यक उपाययोजना

- ❒तलावाचे गाळ काढण्याचे मापदंड बुडीत क्षेत्राचा विचार करुन ठेवावे
- ❒घनमिटर गाळ काढण्यासाठी सीएसआर प्रमाणे दर ठेवायला हवे. बुडीत क्षेत्रातील गाळ तलावानजीक बाहेर काढून २ ते ३ किमीपर्यंत ठेवण्याचे नियोजन हवे.
- ❒अतिक्रमण झालेल्या तलावांची मोजणी भूमिअभिलेख विभागामार्फत करुन हद्द निश्चित करण्याची गरज.
- ❒पाणी वापर सहकारीसंस्था स्थापन करण्याची कारवाई कंत्राटदाराकडूनच असावी.
- ❒तलावातील मत्स्य खड्याचे आकारमान वाढविण्याची गरज.
- ❒मापदंड निश्चित करतांना अंदाजपत्राकाची पुर्ण रक्कम विचारात न घेता जीएसटी, रायल्टी खर्च वगळून मापदंड घेतल्यास अधिकाधिक कामाचा समावेश अदांजपत्रात होऊ शकतो.
- ❒गोंदिया जिल्ह्यातील तलावांची दुरुस्ती करतांन पिर्चीगकरीता लागणार दगड उपलब्ध नसल्याने दगडाऐवजी १ फुट रुंदीचे सिमेंट पेर्व्हींग ब्लॉक वापरल्यास पाळीचे सुशोभीकरण सुध्दा होईल

ज्यावेळी हा पुनरुज्जीवनाचा कार्यक्रम हाती घेण्यात आला, त्यावेळी १२५०० रुपये प्रती हेक्टरी तलाव खोलीकरणाचे दर निश्चित करण्यात आले होते. जर एखाद्या मामा तलावाचे क्षेत्र हे २० हेक्टरचे असेल तर २.५० लाख रुपये खोलीकरणासाठी मिळाले, त्या खोलीकरणातून फक्त ४००० घनमीटर एवढाच गाळ बाहेर निघेल.मात्र उर्वरित गाळ काढण्याकरीता जे माफदंड असायला हवे होते ते नसल्याने ती गाळ काढली जाऊ शकली नाही. त्याकरीता या गोष्टीचा नियोजनच त्या पुनरुज्जीनव आराखड्यात करण्यात आले नाही. तर दुरुस्तीमध्ये एका तलावावर जरी ३ गेट असतील तर कुठल्याही एकाच गेटची दुरुस्ती करुन निधी खर्च झाल्याचे दाखवून त्या योजनेला यशस्वी दाखवण्याचे काम झाले असले तरी त्या योजनेतून मात्र पाहिजे तसा लाभ झालेला दिसून येत नाही. त्यामुळे मामा तलावांच्या पुनरुज्जीवनाचा आराखडा तयार करतांना वास्तविक प्रत्येक जिल्ह्यातील तलावांची संख्या आणि त्या तलावांमध्ये तातडीने दुरुस्ती असलेले तलावांचे प्राधान्यक्रम ठरवून ५ वर्षाचा आराखडा तयार होणे गरजेचे होते. सरसकट सर्वच तलावावर निधी खर्च होत असल्याने कुठलाही एकही तलाव पुर्णतः दुरुस्त होत नसल्याने त्या तलावातील पाणी योग्यपध्दतीने पोचत नाही. त्याकरीता तलावांची दुरुस्तीचे प्राधान्य ठरवून एखाद्या तलावाला ५ गेट असतील तर त्या पाचही गेटची संपूर्ण दुरुस्ती ही त्या गेटपासून शेवटच्या शेतापर्यंत पाणी पोचविणाऱ्या कालव्याचीही दुरुस्ती करुन त्या दुरुस्तीच्या कामाला प्रमाणीत करुन घेणे आवश्यक आहे.



### अतिक्रमण व गाळ केरकचरामुळे तलावाचे सपाटीकरण होऊ लागले

**गोंदिया शहरानजीकच्याच फुलचूर येथील तलावाला बुजवून शासकीय तंत्रनिकेतन व नंगपूरा मुर्री येथील तलाव बुजवून मागासवर्गीय आश्रमशाळेचे बांधकाम करण्यात आलेले आहे.हे दोन तलाव बुजेपर्यत लघुपाटबंधारे विभागाने लक्ष दिले नव्हते. शेवटी तलावात गाळ आणि केरकचरा साठल्यानंतर मात्र तलाव कामाचे नाही असा शेरा देऊन ती जागा बांधकामासाठी देण्यात आली. तीच परिस्थिती गोंदिया शहरातील छोटा गोंदिया परिसरात जुना तलाव आजही आहे, जो जिल्हा परिषदेच्या मालकीचा आहे. त्या तलावाच्या आजूबाजूला लोकांनी अतिक्रमण करुन पक्के घरांचे बांधकाम केल्याने या तलावाचे क्षेत्रफळही लहान झाले आहे. कालव्यांची अपूर्ण कामे, वाढते अतिक्रमण, गाळाचा उपसा न होणे यामुळे तलाव बिनकामाचे ठरले.**

तलावांची देखभाल व्हावी व सिंचनाचा प्रश्न निर्माण होऊ नये यासाठी पाटबंधारे विभागाकडून वारंवार निधीची मागणी करण्यात येते. मात्र निधीची मागणी करतांना प्राधान्यक्रम न ठरवता सरसकट निधी मागून सर्वांना खुश करण्यासाठीचे कार्यक्रम म्हणजे तलाव दुरुस्ती असे ब्रीद जिल्हा परिषदांनी ठरविल्यानेच आज पुर्व विदर्भातील एकही मामा तलाव हा आमचा मॉडेल तलाव असल्याचे दाखवू शकत नाहीत.

आजघडीला गोंदिया जिल्ह्यात ८ मध्यम प्रकल्प, २२ लघु प्रकल्प, १४२१ माजी मालगुजारी तलाव, १९२ लघु सिंचन तलाव, २६ पाझर तलाव, २९४ कोल्हापुरी बंधारे, १५५९ संग्रहित बंधारे व ४१ सिमेंट नाले आहेत. १,६०२ मालगुजारी तलाव भंडारा जिल्ह्यात आहेत.

मुख्य व्यवसाय शेतीच असल्याने तलावांच्या उद्धारावरच येथील अर्थकारण अवलंबून असल्याने हा प्रश्न प्राधान्याने सोडविणे गरजेचे आहे. सिंचनक्षमता कमी झाल्याने मामा तलाव दोन महिन्यात रिकामे होतात. शासनाने तलाव ताब्यात घेतले; मात्र देखभाल दुरुस्तीकडे दुर्लक्ष केले. खोलीकरण केले तरच तलावांचे आणि परिसरातील नागरिकांचे भाग्य उजळू शकते. अन्यथा मामा तलाव नकाशावर राहतील, यात शंका नाही. तलावांच्या खोलीकरणासोबतच तलावातून शेतकऱ्यांच्या शेतीपर्यंत जाणारे नहर बनणे गरजेचे आहे. नहरापासून प्रत्येक बांधापर्यंत जाणाऱ्या कॅनलचे बांधकाम झालेले नसल्याने पाणी जमिनीत मुरते. त्यामुळे पाण्याचा अपव्यय होतो.

# गोंदिया बाजार समिती निवडणुकीत माजी आमदार अग्रवाल व जैन यांच्या पॅनलचा दारुण पराभव

## बाजार समितीवर अपक्ष आमदार विनोद अग्रवाल व काँग्रेसच्या परिवर्तन पॅनलचा झेंडा



**गोंदिया:-** गोंदिया कृषी उत्पन्न बाजार समितीकरीता शुक्रवारला झालेल्या मतदनाची मतमोजनी आज(दि.२९) शनिवारला करण्यात आली.या मतमोजणीत प्रस्थापित सत्ताधारींना धक्का देत अपक्ष आमदार विनोद अग्रवाल व काँग्रेसच्या परीवर्तन पॅनलने १८ पैकी १४ जागा जिंकून बाजार समितीची सत्ता आपल्या हाती घेतली आहे.

या निवडणुकीत भाजपचे माजी आमदार गोपालदास अग्रवाल व राष्ट्रवादी काँग्रेसचे माजी आमदार राजेंद्र जैन यांच्या भाजप राष्ट्रवादी आघाडीचा मोठा पराभव झाला आहे. परिवर्तन पैनलच्यावतीने धनंजय तुरकर, भाऊराव ऊके, मुनेश रहांगडाले, जितेश टेंभरे, राजकुमार(पप्पू) पटले, अरुण गजभिये, शामकला पाचे, मुरली नागपुरे,सौ.कौशल छत्रपाल तुरकर आदिसह १४ उमेदवार विजयी झाले आहेत. शिवसेना उध्दव ठाकरे गटाचे पंकज यादव हे सेवा सहकारी गटातून विजयी झाले आहेत.

विशेष म्हणजे माजी आमदार गोपालदास अग्रवाल, माजी आमदार राजेन्द्र जैन यांच्या सहकार पैनल (बीजेपी-राकांपा) ला पराभवाचा मोठा फटका सहन करावा लागला. सहकार पैनलचे एकमेव उमेदवार कृउबास माजी उपसभापति धनलाल ठाकरे निर्विरोध विजयी झाले होते.

# तिरोडा बाजार समितीवर आमदार रहागंडालेच्या नेतृत्वात भाजपचे वर्चस्व



**गोंदिया:** जिल्ह्यातील तिरोडा कृषी उत्पन्न बाजार समितीच्या झालेल्या निवडणुकीची मतमोजणी पार पडली. या निवडणुकीत भारतीय जनता पक्षाने बाजार समितीवरील सत्ता कायम ठेवली असून आमदार विजय रहागंडाले यांच्या नेतृत्वात १८ पैकी १० जागा जिंकून एकहाती विजय मिळविला आहे.या निवडणुकीत भाजप १०,राष्ट्रवादी काँग्रेस ४,काँग्रेस ३ व अपक्षाने १ जागा जिंकली. बाजार समितीच्या सेवा सहकारी गटात ओम पटले (काँग्रेस),रमेश टेंभरे (काँग्रेस),रामसागर धावडे (राष्ट्रवादी),मनिषा पटले (राष्ट्रवादी),दुर्गाप्रसाद कोठे (राष्ट्रवादी),अनिल भगत (राष्ट्रवादी), जितेंद्र राहंगडाले (भाजपा),प्रतिमा सुभाष जैतवार (भाजपा),भूमेश्वर राहंगडाले (भाजपा),डॉ. गोवर्धन चव्हाण (भाजपा) व जयप्रकाश गौतम (भाजपा) विजयी झाले. व्यापारी गटात भूषण झरारिया (भाजपा),शरद अग्रवाल (अपक्ष), ग्रामपंचायत गटातून रवींद्र वहिले (भाजपा),मिलिंद कुंभरे (भाजपा), घनश्याम पारधी (भाजपा),मदन पटले (काँग्रेस),हमाल तोलारी गटातून ललिताबाई नागरिकर (भाजपा) विजयी झाले.

# आमगावात भाजप-राकाँ युतीचा विजय,तर अर्जुनी मोरगावात भाजप-महाविकासआघाडी फिफ्टी फिफ्टी



**गोंदिया:** जिल्ह्यातील आमगाव कृषी उत्पन्न बाजार समितीच्या निवडणुकीत माजी आमदार व विद्यमान सभापती केशवराव मानकर यांच्या नेतृत्वातील भाजप-राष्ट्रवादी काँग्रेसच्या पॅनलने १८ पैकी १४ जागा जिंकून आपले वर्चस्व कायम ठेवले.तर भाजप बंडखोर गट व काँग्रेसआघाडीच्या पॅनलने ४ जागा जिंकल्या.या निवडणुकीत भाजप-राष्ट्रवादी समर्थित पॅनेलचे आमगाव विकास पॅनलचे सेवा सहकारी मतदार संघ सर्वसाधारण गटातून केशवराव मानकर, संजय नागपुरे, टीकाराम मेंढे, राजेश भक्तवती, अनिल शर्मा विजयी झाले तर महिला गटातून चिंतनबाई तुरकर व शशिकला दोनोडे,इतर मागासवर्ग गटातून युवराज बिसेन व भटक्या विमुक्त जाती गटामधून विनोद कन्नमवार यांचा विजय झाला.

ग्रामपंचायत मतदार संघ सर्वसाधारण गटातून गणेश हर्षे, अनुसूचित जाती-जमाती गटातून उत्तम नंदेश्वर, व्यापारी व अडते मतदार संघातून सचिन अग्रवाल व सोमेश असाटी आणि हमाल व तोलारी मतदारसंघातून महेश चूटे विजयी झाले आहेत. काँग्रेस समर्थित किसान विकास परिवर्तन पॅनलचे फक्त चार संचालक निवडून आले. यात सेवा सहकारी सर्वसाधारण गटातून भूपेश अग्रवाल, हुकुमचंद बोहरे आणि ग्रामपंचायत गटातून संजय बहेकार व महेश उके विजयी झाले आहेत.



अर्जुनी मोरगाव बाजार समितीच्या निवडणुकीत मात्र भाजपसमर्थित पॅनलने ९ जागा व काँग्रेस-राष्ट्रवादी-शिवसेना ठाकरे गटाच्या आघाडीने ९ जागा जिंकल्याने याठिकाणी सत्तेसाठी फोडाफोडीचे राजकारण महत्वाचे ठरणार आहे.विद्यमान आमदार मनोहर चंद्रिकापूरे की माजी आमदार राजकुमार बडोले सत्तेची चाबी आपल्याकडे ठेवतात यावरच पुढील राजकारणाचे गणित ठरणार आहे. राष्ट्रवादी काँग्रेस कायम टिकणार की जिल्ह्यातील समीकरणानुसार भाजपला जाऊन मिळणार याकडेही लक्ष लागले आहे.या निवडणुकीत भाजपा समथीत पॅनलकडून लायकराम भेंडारकर, काशीमजमा कुरेशी,रतीराम कापगते, प्रदीप मस्के,व्यंकट खोब्रागडे, आशा नाकाडे,शारदा नाकाडे, वामन राऊत व नवल चांडक (अविरोध) निवडून आले. तर महाविकास आघाडीच्यावतीने यशवंतराव परशरामकर (राकाँ), लोकपाल गहाने (रांकाँ),होमदास ब्राम्हणकर(उद्धव बाळासाहेब ठाकरे शिवसेना), सर्वेश भुतडा(अविरोध) (काँग्रेस),किशोर ब्राम्हणकर(राकाँ),मोरेश्वर सोनवाणे(काँग्रेस),हेमकृष्ण(दादा) संग्रामे (राकाँ),अनिल दहिवले (काँग्रेस) व खुशाल गेडाम (काँग्रेस) निवडून आले.

# प्रजासत्ताक दिनानिमित्त आयोजित संचलनात गोंदिया-गडचिरोली सी-६० पथक प्रथम



**गोंदिया:** प्रजासत्काक दिनानिमित्त छत्रपती शिवाजी पार्क, दादर (मुंबई) येथे आयोजित संचलनामध्ये २१ पथकांनी सहभाग घेतला होता. यात सर्वोत्कृष्ट संचलन केल्यामुळे गोंदिया-गडचिरोली सी-६० पथकाने प्रथम क्रमांक प्रप्त केला. दरम्यान २९ एप्रिल रोजी छत्रपती शिवाजी पार्क, दादर (मुंबई) येथे आयोजित बक्षिस वितरण कार्यक्रमामध्ये अपर पोलीस महासंचालक अनुप कुमार, यांचे हस्ते गोंदिया-गडचिरोली सी-६० पथकाचे नेतृत्व करणारे पथक प्रमुख देवीदास कठाळे, पोलीस निरीक्षक, गोंदिया यांचा सन्मानचिन्ह देऊन गौरव करण्यात आला.

प्रजासत्ताक दिनानिमित्त आयोजित संचालनात गोंदिया-गडचिरोली सी-६० पथकाने उत्कृष्ट संचालन करीत प्रथम क्रमांक प्राप्त केल्याने जिल्हा पोलिस अधीक्षक निखिल पिंगळे, पोलीस अधीक्षक निलोत्पल, अशोक बनकर यांनी संचलनामध्ये सहभागी असणारे गोंदिया जिल्हा पोलीस दलाचे पोलीस निरीक्षक देवीदास कठाळे, पोलीस उपनिरिक्षक खेडकर, ढाकणे आणि गडचिरोली पोलीस दलाचे पोलीस निरीक्षक अमोल फडतरे, पोलीस उप निरीक्षक सतिश पाटील, बोडरे यांचे तसेच संचलनामध्ये सहभागी झालेल्या सी-६० पथकातील सर्व कमांडोंचे अभिनंदन करुन कौतुक केले आहे व सी-६० पथक कायम सर्वोत्कृष्ट राहण्याकरिता शुभेच्छा दिल्या आहेत.

# मानसिक रुग्ण असलेल्या महिलेला पोलिसांच्या मदतीने उपचारकरीता नागपूरला हलवले

**गोंदिया:-** तालुक्यातील रावणवाडी पोलीस ठाणेतर्गत येत असलेल्या बघोली गाव परिसरात अनोळखी मानसिक रुग्ण असलेली महिला फिरत असल्याची माहिती जेसीआयचे समाजसेवक व उपविभागीय अभियंता वासुदेव रामटेककर यांनी दुरध्वनीवर आंभोरा निवासी सिध्दार्थ वंजारी यांनी दिली.त्या माहितीच्या आधारे श्री.रामटेककर यांनी जेसीआईच्या पूर्व अध्यक्षा एड. किती आहूजा व भूमी वतवानी यांच्यासह बघोली गावाला भेट देत त्या मानसिक महिला रुग्णाची विचारपुस करून माहिती घेण्याचा प्रयत्न केला.मात्र स्मृतिभंग झाल्याने २० वर्षीय असलेली ही मुलगी स्वतः चे नाव आदी माहिती काहीच सांगू शकली नाही.परंतु तिच्या भाषेवरुन ती ओडिसा किंवा पश्चिम बंगालकडील असावी अंदाज लावून सदर मानसिक रुग्ण असलेल्या मुलीची माहिती रावणवाडीचे पोलीस निरिक्षक अभिजित भूजबळ यांना दिली.त्यानंतर पोलीस निरिक्षक भुजबळ यांनी प्रकरणाचे गांभीय लक्षात घेत महिला पोलिसांच्या मदतीने त्या मानसिक रुग्ण महिलेला जिल्हा सामान्य रुग्णालयात दाखल करुन तिची तपासणी केल्यानंतर नागपूर येथील प्रादेशिक मानसिक रुग्णालय नागपूर येथे पुढील उपचाराकरीता पोलीस शिपाई फनेन्द्र बिंजवार, महिला पोलिस मोनिका डोंगरेच्या संरक्षणात रवाना केले.

# सडक अर्जुनी बाजार समितीवर राँका-भाजप-सेना तर गोरेगावात भाजपप्रणीत पॅनलचा विजय




**गोंदिया :** जिल्ह्यातील गोरेगाव व सडक अर्जुनी या दोन बाजार समित्यांसाठी आज भर पावसात मतदान झाले.त्यानंतर झालेल्या मतमोजणीच्या निकालानुसार भाजप आघाडीने दोन्ही ठिकाणी विजय मिळविला आहे. विशेष म्हजे माजी मंत्री राजकुमार बडोले यांच्या पत्नी शारदा राजकुमार बडोले या सडक अर्जुनी बाजार समितीच्या निवडणुकीत सहकारी महिला राखीव गटातून रिंगणात होत्या,त्यांनी विजय मिळविला आहे.सडक अर्जुनी बाजार समितीवर राष्ट्रवादी काँग्रेस-भाजप-शिवसेनेच्या पॅनलचा विजय झाला आहे.यामध्ये या युतीने १८ पैकी १७ जागा जिंकल्या आहेत.यात ९ राष्ट्रवादी,१ शिवसेना आणि ७ जागा भाजपने जिंकल्या आहेत.तर एक अपक्ष निवडून आले आहे.

तर गोरेगाव बाजारसमितीवर भाजप काँग्रेस राकाँ च्या किसान सहकार पॅनलने एकहाती विजय मिळविला.विशेष म्हणजे या निवडणुकीत माजी बाजार समितीचे सभापती मलेश्याम येरोला यांचा पराभव झाला असून भाजप समर्थित अपक्ष उमेदवार महेंद्र ठाकूर हे विजयी झाले आहेत.भाजपप्रणीत किसान सहकार पॅनलने १८ पैकी १६ जागा जिंकल्या.

सडक अर्जुनी येथे नाना पटोले यांच्या गटाला सहकार क्षेत्रापासून लांब ठेवण्याकरिता भाजपा -राष्ट्रवादी- शिवसेना अशी अभद्र युती झाली या युतीने काँग्रेसला पराभूत करीत विजय मिळविला आहे. तर गोरेगाव बाजार समितीत भाजपा-काँग्रेस-राकाँ विरुद्ध काँग्रेस,राकाँ-शिवसेना असा सामना तालुका खरेदी विक्रीच्या निवडणुकीसारखाच रंगला.काँग्रेसच्या वरिष्ठ नेत्यांच्या गप्प राहण्याच्या भूमिकेमुळे गोरेगावात काँग्रेस दुभगंली गेली आणि भाजपप्रणित आघाडीला विजय मिळाला.

सडक अर्जुनी बाजार समितीच्या निवडणुकीत शारदा राजकुमार बडोले(भाजप), अस्मिता अशोक मेंढे (राष्ट्रवादी), खेमराज देशमुख (राष्ट्रवादी), विलास बागळकर (भाजप), रतीराम शितकु कांबळे (राष्ट्रवादी काँग्रेस),हरीश देवराम बनसोड(भाजप),देवानंद सदाशिव वंजारी (भाजप),अविनाश काशिवर राष्ट्रवादी काँग्रेस ( अविरोध निवड ), रामकृष्ण गणपत नान्हे (राष्ट्रवादी काँग्रेस,अविरोध) दुर्वास गहाणे (राष्ट्रवादी)दामोदर बोपचे(राष्ट्रवादी) निवड, हेमंत कोरे (भाजप) हर्ष मोदी (भाजप), ज्ञानेश्वर उर्कुडा रहांगडाले (राष्ट्रवादी),राजू हेडाऊ (शिवसेना) हे विजयी झाले.

गोरेगाव बाजार समितीच्या निवडणुकीत गोरेगाव बाजारसमितीवर भाजप काँग्रेस राकाँ च्या किसान सहकार पॅनलचे ग्राम पंचायत गटातून तेजेंद्र हरिणखेडे, नुमानचंद चौधरी, नरेंद्र रहांगडाले, महिला गटातून शशीताई फुंडे, अडते व्यापारी व हमाल गटातून गोपाल ठाकूर,योगराज पटले, राजेश ताराम, तर कैलास डोगंरे,गिरधारी बघेले,दसाराम साऊसकर (अविरोध), सेवा सहकारी गटातून किशोर गौतम,मोहन ठाकरे, योगराज पारधी,उकराम बिसेन, संजय भगत, संतोष रहांगडाले, अपक्ष महेंद्र ठाकूर तर सहकार परिवर्तन पॅनलच्या डिलेश्वरी तिरेले या महिला गटातून एकमेव विजयी झाल्या.



# सर्वसामान्य नागरिकांचा विकास व जिल्ह्याची प्रगती हेच प्रशासनाचे ध्येय-जिल्हाधिकारी चिन्मय गोतमारे



**गोंदिया :** महाराष्ट्र हे विकसनशील राज्य असून लोककल्याणकारी योजना राबविण्यात आपले राज्य देशात अग्रेसर राहिले आहे. शेवटच्या माणसाचा विकास हे ध्येय समोर ठेवूनच आजपर्यंत राज्याची वाटचाल राहिली आहे. यापुढेही सर्वांना सोबत घेऊन सर्वसामान्य नागरिकांचा विकास व जिल्ह्याची प्रगती हेच प्रशासनाचे ध्येय असेल अशी ग्वाही जिल्हाधिकारी चिन्मय गोतमारे यांनी महाराष्ट्र दिनी जिल्हावासीयांना दिली. महाराष्ट्र दिन व कामगार दिनाच्या जिल्हावासीयांना त्यांनी शुभेच्छा दिल्या.

पोलीस कवायत मैदान कारंजा-गोंदिया येथे आयोजित महाराष्ट्र राज्य स्थापनेच्या ६३ व्या वर्धापन दिनाच्या मुख्य समारोह कार्यक्रमात ते बोलत होते. जिल्हा पोलीस अधीक्षक निखिल पिंगळे, भारतीय राखिव बटालियनचे समादेशक अमोल गायकवाड, अपर जिल्हाधिकारी सुभाष चौधरी, निवासी उपजिल्हाधिकारी स्मिता बेलपत्रे, अधिष्ठाता डॉ. कुसुमाकर घोरपडे, विद्यार्थी, पत्रकार व नागरिक यावेळी उपस्थित होते.

नुकताच महाराष्ट्राचा अर्थसंकल्प मांडण्यात आला. विकासाच्या पंचसुत्रीवर आधारित हा अर्थसंकल्प आहे. शाश्वत शेती-समृद्ध शेतकरी, महिला, आदिवासी, मागासवर्ग, ओबीसींसह सर्व समाजघटकांचा सर्वसमावेशक विकास, भरीव भांडवली गुंतवणुकीतून पायाभूत सुविधा विकास, रोजगारनिर्मिती : सक्षम, कुशल, रोजगारक्षम युवा व पर्यावरणपूरक विकास ही ती पंचसूत्री आहे. यावर आधारित महाराष्ट्राचा सर्वांगीण विकास करण्याचा शासनाचा निर्धार असल्याचे त्यांनी सांगितले.

हिंदूहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे महाराष्ट्र समृद्धी महामार्गाचा नागपूर ते गोंदिया विस्तार करण्यात येणार आहे. यामुळे जिल्ह्याच्या विकासाला गती प्राप्त होईल. शासनाने घोषित केल्याप्रमाणे धान उत्पादक शेतकऱ्यांना प्रती हेक्टर १५ हजार रुपये बोनस देण्यात येत आहे. शासकीय आधारभुत धान खरेदी योजनेअंतर्गत जिल्ह्यातील १ लाख १२ हजार शेतकऱ्यांना १६६ कोटी प्रोत्साहन राशी अदा करण्यात आलेली आहे. अतिवृष्टी नुकसान भरपाई रक्कमेत शासनाने दुप्पट वाढ केली आहे. कोतवालांचे मानधनात वाढ करुन आता १५ हजार रुपये मानधन मिळणार आहे. राज्य परिवहन महामंडळाच्या बस मध्ये तिकीट दरात महिलांना सरसकट ५० टक्के सुट देऊन महिला सक्षमीकरणाच्या दृष्टीने महत्वाचे पाऊल उचलले असल्याचे जिल्हाधिकाऱ्यांनी सांगितले.

महाराष्ट्रातील शेतकऱ्यांना आता केवळ एक रुपयात पीकविमा काढता येणार आहे ही बाब शेती विकासाला चालना देणारी आहे. शासनाने मुलींच्या सक्षमीकरणासाठी "लेक लाडकी" योजना आता नव्या स्वरुपात आणली असून पिवळ्या आणि केशरी रेशनकार्डधारक कुटुंबांतील मुलींना या योजनेचा लाभ मिळणार आहे. पारंपारिक मासेमारी करणाऱ्या मासेमार बांधवांसाठी केंद्राच्या मदतीने ५ लाखांचा विमा देण्यात येणार आहे. आशा स्वयंसेविका, अंगणवाडी सेविकांच्या मानधनात शासनाकडून भरीव वाढ करण्यात आली असल्याचे त्यांनी सांगितले.

महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजनेत आता ५ लाखांपर्यंत उपचार करता येणार आहे. या योजनेत अल्प उत्पन्न असलेल्या पिवळा व संेदरी कार्डधारकांना लाभ देण्यात येतो. मार्च २०२३ पर्यंत ३५ हजार १८३ लाभार्थ्यांनी या योजनेचा लाभ घेतला आहे. १०८ वैद्यकीय आपातकालीन सेवेचा १ लाख ६० हजार ७९६ लोकांनी लाभ घेतलेला आहे.

संजय गांधी निराधार/श्रावणबाळ योजनेत आता १५०० रुपये अर्थसहाय्य करण्यात आले आहे. अल्पसंख्याक समाजातील उच्च शिक्षण घेणाऱ्यांना विद्यार्थ्यांना ५० हजार रुपये शिष्यवृत्ती देण्यात येत आहे. पर्यटनाला चालना देण्यासाठी प्रत्येक जिल्ह्यातील ५०० युवकांना जल, कृषी, कॅराव्हॅन, साहसी पर्यटन तसेच आदरातिथ्य क्षेत्राचे प्रशिक्षण देण्यात येणार आहे. यामुळे पर्यटकांच्या संख्येत वाढ होण्यास मदत होईल. प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण मध्ये महाराष्ट्रात सर्वात जास्त घरकुल पुर्ण केल्यामुळे महाआवास-१ मध्ये गोंदिया जिल्हा प्रथम क्रमांकाच्या पारितोषिकाचा मानकरी ठरला आहे, ही जिल्ह्यासाठी अभिमानाची बाब आहे.

जिल्ह्यातील नक्षलग्रस्त भागातील सुशिक्षीत बेरोजगार नवयुवक-युवतींना रोजगाराची संधी उपलब्ध व्हावी या दृष्टीने "सुरक्षा जवान" या पदाकरीता ६ नक्षलग्रस्त पोलीस स्टेशन स्तरावर रोजगार मेळावे घेऊन १११ पात्र युवकांची निवड करुन त्यांना नियुक्तीपत्र देण्यात आले. तसेच पोलीस दादालोरा खिडकी योजनेअंतर्गत पोलीस प्रशासनाच्या मदतीने नागरिकांना शासकीय योजनांचा लाभ मिळावा यासाठी आवश्यक असणारे विविध प्रकारचे दाखले तयार करण्यासाठी ६ नक्षलग्रस्त पोलीस स्टेशन व ११ सशस्त्र दूरक्षेत्र स्तरावर वेगवेगळ्या तारखेस शिबिरे आयोजित करुन विविध प्रकारचे ३ हजार दाखले तयार करुन देण्यात आल्याचे त्यांनी सांगितले.

महात्मा जोतिराव फुले शेतकरी कर्जमुक्ती योजना-२०१९ अंतर्गत गोंदिया जिल्ह्यामध्ये आज अखेर एकूण २३ हजार ७६७ शेतकरी पात्र झालेले आहे. आधार प्रमाणिकरण प्रक्रिया सुरु असून गोंदिया जिल्ह्यातील पोर्टलनुसार २३ हजार १५३ शेतक?यांचे आधार प्रमाणिकरण झाले आहे. त्यापैकी २१ हजार ४० शेतकऱ्यांना ६७ कोटी रुपयांचा लाभ मिळालेला आहे. तृणधान्याचे मानवी आहारातील महत्व व फायदे याबाबत जनमाणसात जागरुकता निर्माण करुन पौष्कि तृणधान्याच्या लागवडीस प्रोत्साहन देण्यात येत आहे.

जिल्हा पर्यटन विकास समिती व वन विभाग अंतर्गत नवाटोला संयुक्त वनव्यवस्थापन समिती नवाटोला यांचे संयुक्त विद्यमाने हाजराफॉल या नैसर्गीक पर्यटन स्थळाचे विकासाचे कार्य करुन २६ युवक व २२ युवती असे एकूण ४८ स्थानिक होतकरु व प्रशिक्षीत युवक-युवतींना रोजगार प्राप्त झालेला आहे. सन २०२२-२३ मध्ये २३ हजार ८९४ पर्यटकांनी भेट दिली असून त्याद्वारे २४ लाख ६३ हजार रुपये महसूल प्राप्त झालेला आहे.

बाल संगोपन योजनेअंतर्गत आतापर्यंत १ हजार बालकांना ९४ लाख रुपये अनुदान स्वरुपात लाभ देण्यात आलेला आहे. माझी कन्या भाग्यश्री योजनेअंतर्गत आजपावेतो जिल्ह्यात १६९७ लाभार्थ्यांना ४ कोटी २९ लाख २५ हजार रुपयांचे मुदत ठेव प्रमाणपत्र वितरीत करण्यात आलेले आहे.

आदिवासी समाजातील विद्यार्थ्यांचा शैक्षणिक, बौध्दिक व सामाजिक विकास व्हावा या दृष्टीने "मिशन शिखर' उपक्रमांतर्गत विद्यार्थ्यांनी अहोरात्र परिश्रम करुन १७ विद्यार्थ्यांनी वैद्यकीय व अभियांत्रिकी क्षेत्रात आपले स्थान निर्माण केले आहे. तसेच यावर्षी देवरी प्रकल्पातून २० विद्यार्थ्यांना भारतीय अंतराळ संशोधन संस्था इस्रो करीता अभ्यास दौरा आयोजित करण्यात आलेला असून आश्रमशाळेतील निवडक विद्यार्थ्यांची निवड करुन प्रथमच विमानाने प्रवास करण्यात येणार आहे.

कृषी पंप ऊर्जीकरण योजनेत आतापर्यंत ९ हजार ८०६ कृषी पंपाना वीज जोडणी देण्यात आलेली आहे. दीनदयाल उपाध्याय ग्रामज्योती योजना, एकात्मिक ऊर्जा विकास योजना, मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजना, विलासराव देशमुख अभय योजना यासारख्या योजनेत जिल्ह्याने लक्षणीय काम केले असून शेतकऱ्यांना व सर्वसामान्यांना लाभ देण्यात येत आहे.

राज्य शासन सामान्य जनतेसाठी विविध लोकोपयोगी योजना राबवीत आहे. सामान्य जनतेला शासकीय योजनांची माहिती, अर्ज केल्यावर लाभ कसा मिळतो, कुठे अर्ज करावा, कागदपत्रे काय जोडावीत याची माहिती नसते. यामुळे काही जण शासकीय योजनांपासून वंचित राहतात. याचा विचार करुन शासकीय योजना गतिमान आणि शेवटच्या व्यक्तीपर्यंत पोहोचविण्यासाठी 'शासकीय योजनांची जत्रा' हा उपक्रम सुरू करण्याचा निर्णय शासनाने घेतला असून लवकरच हा उपक्रम गोंदिया जिल्ह्यात राबविण्यात येणार आहे. 'शासन आपल्या दारी' या हेतूने हा उपक्रम राबविण्यात येणार असून योजनांचा लाभ घेण्यासाठी नागरिकांनी संबंधित विभागाकडे अर्ज करावा, असे आवाहन त्यांनी याप्रसंगी केले.



महाराष्ट्राने ६३ वर्षात नेत्रदिपक कामगिरी करुन विविध क्षेत्रात देशात अव्वल स्थान पटकाविले आहे. देशाच्या विकासात महाराष्ट्राचे योगदान महत्वपूर्ण आहे. यासोबतच जिल्हा परिषद, कृषी विभाग, आरोग्य विभाग, वन विभाग, पोलीस प्रशासन, महसूल विभाग, समाजकल्याण, आदिवासी विभाग, सार्वजनिक बांधकाम विभाग व इतर सर्व विभागामार्फत सर्वसामान्यांच्या हिताचे व लोककल्याणकारी योजनांची योग्यरित्या अंमलबजावणी करण्यात येत आहे. सर्वसामान्य नागरिकांचा विकास व जिल्ह्याची प्रगती हेच प्रशासनाचे ध्येय आहे. सर्वांगिण विकासासाठी कटीबध्द होऊन जिल्हा अग्रेसर ठेवू या असे जिल्हाधिकारी म्हणाले.

प्रारंभी जिल्हाधिकारी चिन्मय गोतमारे यांनी ध्वजारोहण करुन परेडचे निरीक्षण केले. पुरुष व महिला पोलीस दल, पुरुष व महिला होमगार्ड पथक, पोलीस बँड पथक, पोलीस श्वान पथक, अग्नीशमन दल, आरोग्यवाहिका यांनी परेड संचलन केले.

कार्यक्रमास उपजिल्हाधिकारी (रोहयो) लिना फलके, उपविभागीय अधिकारी पर्वणी पाटील, जिल्हा अधीक्षक भूमी अभिलेख रोहिणी सागरे, जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. अमरीश मोहबे, जिल्हा क्रीडा अधिकारी घनश्याम राठोड, अपर कोषागार अधिकारी लेखीचंद बाविस्कर, न.प. मुख्याधिकारी करण चव्हाण, जिल्हा आपत्ती व्यवस्थापन अधिकारी राजन चौबे, जिल्हाधिकारी कार्यालयाचे अधीक्षक संजय धार्मिक, तहसिलदार मानसी पाटील, सहायक उपवनसंरक्षक प्रदिप पाटील, अपर तहसिलदार प्रकाश तिवारी यांचेसह विविध विभागाचे विभाग प्रमुख, अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. सुत्रसंचालन मंजुश्री देशपांडे यांनी केले. यावेळी विविध क्षेत्रात उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या व्यक्तींचा जिल्हाधिकाऱ्यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

# शाश्वत स्वच्छता टिकवून गावांचा विकास साधा-मुकाअ अनिल पाटील

## संत गाडगेबाबा ग्राम स्वच्छता अभियान सन २०२२-२३ अंतर्गत जिल्हास्तरीय तपासणी



**गोंदिया:-** संत गाडगेबाबा ग्रामस्वच्छता अभियान अंतर्गत अनेक गावांनी विकास साधला आहे. मात्र गावांनी क्षणिक विकास न साधता शाश्वत स्वच्छता टिकवून आपल्या गावाला चिरकाल स्पर्धेत टिकवून ठेवा, असे आवाहन गोंदिया जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी अनिल पाटील यांनी केले.

जिल्हा पाणी व स्वच्छता विभागाच्या वतीने संत गाडगेबाबा ग्राम स्वच्छता अभियान सन २०२२-२३ अंतर्गत राष्ट्रसंत तुकडोजी महाराज स्वच्छ ग्राम स्पर्धा राबविण्यात येत असून दिनांक २५ एप्रिल २०२३ ते २७ एप्रिल २०२३ या दरम्यान जिल्हास्तरीय तपासणी करण्यात आली. या तपासणीवेळी ग्राम पंचायतींना भेटी देऊन तपासणी केली असता उपस्थितांना मार्गदर्शन करताना ते बोलत होते.

यावेळी ५३ जिल्हा परिषद गटातील प्रथम क्रमांक असलेल्या ५३ ग्रामपंचायतीपैकी गुनानुक्रम सर्वोत्कृष्ट ९ ग्रामपंचायतींची तपासणी करण्यात आली. यात २५ एप्रिल रोजी देवरी तालुक्यातील डवकी, सालेकसा तालुक्यातील भजेपार, आमगाव तालुक्यातील तिगाव, २६ एप्रिल रोजी तिरोडा तालुक्यातील मुंडीकोटा, लाखेगाव, धादरी/उमरी तर २७ एप्रिल रोजी सडक अर्जुनी तालुक्यातील कनेरी/राम, अर्जुनी मोरगाव तालुक्यातील चांनना/बा, येगाव या ग्रामपंचायतींची जिल्हास्तरीय तपासणी समितीच्या माध्यमातून तपासणी करण्यात आली.

तपासणी समितीचे अध्यक्ष तथा मुख्य कार्यकारी अधिकारी अनिल पाटील, सदस्य सचिव तथा उप मुख्य कार्यकारी अधिकारी पाणी व स्वच्छता नरेश भांडारकर, समिती सदस्य तथा उपमुख्य कार्यकारी अधिकारी (महिला व बालकल्याण) तसेच प्रभारी जिल्हा समाजकल्याण अधिकारी संजय गणवीर, जिल्हा आरोग्य अधिकारी यांचे प्रतिनिधी व जिल्हा साथरोग अधिकारी डॉ. निरंजन अगरवाल, प्रभारी उपशिक्षणाधिकारी अनिल चव्हाण, महिला व बालविकास विभागाचे प्रतिनिधी व विस्तार अधिकारी विनोद जाधव, संत गाडगेबाबा ग्रामस्वच्छता अभियान जिल्हा समन्वयक भागचंद रहांगडाले व इतर समिती सदस्यांनी केली.

यावेळी देवरी गटविकास अधिकारी दीपक ढोरे, विस्तार अधिकारी पराते, विस्तार अधिकारी झामरे, गट समन्वयक भिमराज पारधी, सालेकसा विस्तार अधिकारी निमजे, समूह समन्वयक महेश वाढई, शोभा डोये, आमगाव गटविकास अधिकारी अर्चना अयाचित, विस्तार अधिकारी पंचायत कुटे, के.एम.रहांगडाले, गट समन्वयक गांधी पटले, तिरोडा गटविकास अधिकारी सतीश लिल्हारे, विस्तार अधिकारी पंचायत शितेश पटले, विस्तार अधिकारी धारगावे, जिल्हा पाणी व स्वच्छता विभागाचे अतुल गजभिये, गट समन्वयक राठोड, समूह समन्वयक पटले, छाया बोरकर, अनुप रंगारी, सडक अर्जुनी गटविकास अधिकारी दिलीप खोटेले, आरोग्य सहायक कटरे, गट समन्वयक राधेश्याम राऊत, भुमेश्वर साखरे, अर्जुनी मोरगाव गटविकास अधिकारी विलास निमजे, विस्तार अधिकारी मोरेश्वर धोंगडे, गट समन्वयक अंबुले, समूह समन्वयक उमेंद्र भगत आदी उपस्थित होते.

## गाळ साचल्याने तलावाचे क्षेत्रफळ झाले कमी

**गोरेगाव:** येथील वनपरिक्षेत्राधिकारी कार्यालयांतर्गत येणारा बंड तलाव मुरदोली मध्यवर्ती रोपवाटिका व वन्यप्राण्यांना जीवदान देणारा तलाव आहे. या तलावाची निर्मिती १९६५ ला करण्यात आली असून हा तलाव २ हेक्टर क्षेत्रफळात पसरला आहे. त्यामुळे या तलावात बारमाही पाणीसाठा राहते. परंतु १९६५ पासून बंड तलावाचे सौंदर्यीकरण न स्वच्छतेकडे वनविभागाने दुर्लक्ष केले आहे. दरम्यान तलावाचे क्षेत्रफळ दरवर्षी कमी होत आहे. त्यामुळे वन्यप्राणी व रोपवाटिका यांची तहान भागविता येणार नाही. वृक्षलागवड प्रक्रियेवर आळा बसणार असल्याची भीती वन्यजीवप्रेमींनी व्यक्त केली आहे.

जिल्ह्यात प्रख्यात मध्यवर्ती रोपवाटिका मुरदोली (नर्सरी) आहे. मध्यवर्ती रोपवाटिकेतील रोपट्यांच्या संगोपणासाठी वन विभागाने पाणी वाहून नेणाऱ्या नाला अडवून बंड नावाचा तलाव १९६५ ला तयार केले. या तलावाच्या पाण्यावर विविध जातींचे वन्यप्राणी आपली तहान भागवित आहेत. त्याचबरोबर रोपट्याला बारमाही पाणी उपलब्ध होत आहे.

# जिल्हाधिकाऱ्यांच्या हस्ते उत्कृष्ठ अधिकारी-कर्मचाऱ्यांचा सत्कार





**गोंदिया :** महाराष्ट्र शासन सेवेत विविध विभागात नियुक्त झालेल्या जिल्ह्यातील तेरा तरुण-तरुणींना महाराष्ट्र दिनी मुख्य समारोह कार्यक्रमात जिल्हाधिकारी चिन्मय गोतमारे यांच्या हस्ते नियुक्ती पत्र वितरीत करण्यात आले. तसेच विविध विभागात उत्कृष्ट काम करणाऱ्या अधिकारी-कर्मचाऱ्यांचा प्रशस्तीपत्र देऊन गौरव करण्यात आला. यावेळी जिल्हा पोलीस अधीक्षक निखिल पिंगळे प्रामुख्याने उपस्थित होते.

राज्यकर निरीक्षक गुलशन भोयर, लेखराज भोयर, भूकरमापक तथा लिपिक पायल बुध्दे, कार्तिक बुरडे, दलिमकुमार हत्तीमरे, अभिलाष मचाडे, अश्विन मेश्राम, दुर्गा भलमे, दुय्यम निरीक्षक शुभम चौधरी, वैद्यकीय अधिकारी डॉ. नितेश राऊत, डॉ. रुपेश चौधरी, डॉ. पराग रहांगडाले व डॉ. रुचा धमगाये यांचा नियुक्ती पत्र मिळालेल्यामध्ये समावेश आहे.

जिल्ह्यातील विविध शासकीय विभागात काम करणाऱ्या अधिकारी-कर्मचाऱ्यांचा यावेळी सत्कार करण्यात आला. एमपीएससी परीक्षेचे नियोजन व विविध निवडणूक विषयक कामे जबाबदारीने पार पाडल्याबद्दल अप्पर कोषागार अधिकारी लखीचंद बाविस्कर यांचा प्रशस्तीपत्र देऊन सत्कार करण्यात आला. जिल्हा पोलीस दलात कार्यरत राजीव केंद्रे, पांडुरंग मुंढे, ओमप्रकाश बोरेवार, तुकाराम नागरे, दीपक चौधरी, संतोष चौधरी, चेतन पटले, कासीमतायर खान, अनिल साळुंखे यांचा पोलीस महासंचालक सन्मान चिन्ह व पदक देऊन गौरव करण्यात आला.

गोंदिया पब्लिक स्कुलचे प्राचार्य जितेंद्र तलरेजा, वर्षा भांडारकर व हरिहरभाई पटेल स्कुल व कनिष्ठ महाविद्यालयाचे प्राचार्य बी. व्ही. शहारे व व्ही. एम. येडे यांचा महसूल विभाग स्तरीय उल्लेखनीय काम केल्याबद्दल छत्रपती शिवाजी महाराज वनश्री पुरस्कार देऊन सत्कार करण्यात आला. दिनबंधू ग्रामीण विकास संस्था देवरी यांना जिल्हास्तर युवा संस्था पुरस्कार मिळाल्याबद्दल गौरवपत्र व सन्मान चिन्हे प्रदान करण्यात आले. ऋतुराज यादव व दिव्या भगत यांना जिल्हा युवा पुरस्कार मिळाल्याबद्दल सन्मान चिन्ह व गौरवपत्र देऊन सन्मानित करण्यात आले. तहसील कार्यालय सडक अर्जुनी येथील तलाठी उमराव वाघधरे यांना आदर्श तलाठी पुरस्कार देऊन गौरविण्यात आले.

# आपत्ती निवारणासाठी सर्व यंत्रणांनी सज्ज रहावे-जिल्हाधिकारी चिन्मय गोतमारे

- संपर्क तुटणाऱ्या गावांची यादी करा
- पुरेसा धान्य व औषध साठा ठेवा
- सर्व विभागांनी समन्वय ठेवावा
- एसओपी अद्ययावत करा
- नियंत्रण कक्ष स्थापन करा



**गोंदिया :** पावसाळा सुरू होण्यास खूप कमी कालावधी बाकी असून अशा परिस्थितीत प्रत्येक विभागाने दक्ष राहणे आवश्यक असून जिल्ह्यातील पुरप्रवण गावांचा सूक्ष्म आराखडा तयार आवश्यक आहे. आपत्ती ही कधीही सांगून येत नसते. तयारी न करता ओढवलेल्या आपत्तीचे व्यवस्थापन करणे कठीण असते. पावसाळ्याच्या दिवसात अचानक पूर येणे, धरण फुटणे, रस्ता वाहून जाणे, गाव पाण्याखाली येणे अशा आपत्ती ओढवतात, त्यामुळे सर्व यंत्रणांनी आपत्ती निवारणासाठी सज्ज रहावे अशा सूचना जिल्हाधिकारी चिन्मय गोतमारे यांनी यंत्रणांना दिल्या.

जिल्हाधिकारी कार्यालयाच्या सभागृहात आयोजित मान्सूनपूर्व तयारी आढावा बैठक आयोजित करण्यात आली होती, त्यावेळी ते बोलत होते. निवासी उपजिल्हाधिकारी स्मिता बेलपत्रे, उपविभागीय अधिकारी अनमोल सागर, अधिष्ठाता डॉ. कुसुमाकर घोरपडे, जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. अंबरीश मोहबे, आपत्ती व्यवस्थापन अधिकारी राजन चौबे व विविध विभागाचे अधिकारी उपस्थित होते.

जिल्ह्यातील जुने रस्ते, ईमारत, पूल, शासकीय इमारत, शाळा, महाविद्यालय, धरण व मामा तलाव इत्यादींचे संबंधित यंत्रणेने संरचना तपासणी (स्ट्रक्चरल ऑडीट) करुन वापरण्यायोग्य असल्याचे प्रमाणपत्र देणे गरजेचे असल्याचे त्यांनी सांगितले. त्याचप्रमाणे नदीक्षेत्र व पाणलोट क्षेत्रात असलेले अतिक्रमण दोन महिन्यात काढण्याची कार्यवाही करावी असे जिल्हाधिकारी म्हणाले. प्रत्येक गावात फर्स्ट रिस्पॉन्स टीम तयार करण्याच्या सूचना केल्या. मान्सून कालावधीत प्रत्येक तालुक्याच्या ठिकाणी नियंत्रण कक्ष स्थापन करुन तो चोविस तास कार्यरत राहिल याची खात्री करावी असे ते म्हणाले.

गोंदिया जिल्ह्यात ९६ गावे पुरप्रवण असून या गावात विशेष उपाययोजना असलेला आराखडा तयार करावा. या गावांसाठी पर्यायी मार्गांची यादी तयार करावी. त्याचप्रमाणे पावसाळ्यात संपर्क तुटणाऱ्या गावांची यादी तात्काळ सादर करावी. मान्सून तसेच आपत्तीच्या वेळेस कार्य प्रणालीची कार्यपद्धती अद्ययावत करावी, असे त्यांनी सांगितले.

१ जून पासून तालुकानिहाय नियंत्रण कक्ष स्थापन करून नियंत्रण कक्षात पूर्ण कर्मचाऱ्यांची नियुक्ती करावी. त्याचप्रमाणे नगरपालिका व ग्रामपंचायत स्तरावर आपत्ती व्यवस्थापन समिती गठीत करण्यात यावी. अनुभवी पोहणाऱ्या व्यक्तींची यादी सुद्धा अद्ययावत करण्यात यावी. या यादीत महसूल व पोलीस विभागातील अनुभवी कर्मचाऱ्यांचा समावेश करण्यात यावा. कार्यप्रणालीची प्रामाणिक कार्यपद्धती (एसओपी) अद्ययावत करून आपत्ती व्यवस्थापन कक्षाला पाठविण्याच्या सूचना त्यांनी केल्या.


धरणाचे पाणी सोडतांना गावकऱ्यांना पूर्व सूचना देण्यात यावी. त्यासाठी दवंडी, सोशल मिडिया आदीचा वापर करण्यात यावा असे त्यांनी सांगितले. आपल्या कार्यक्षेत्रात सुरक्षीत निवारा, समाज भवन, शाळा, मंगल कार्यालय, लॉन, मोठ्या इमारती इत्यादींची ओळख करून त्या आरक्षीत करण्याबाबत कार्यवाही आताच करावी. विविध जलाशय, धरण या ठिकाणी मान्सून कालावधीत सामान्य नागरिकांना जाण्यास प्रतिबंध करणारा आदेश निर्गमीत करावा असे जिल्हाधिकारी यांनी सांगितले.

नदी, नाल्यामधील गाळ काढणे, सफाई व स्वच्छता तातडीने करून घ्यावी. नदी, नाल्याच्या काठावर अतिक्रमण करणाऱ्यांना नोटीस देण्यात यावी. आपल्या जिल्ह्यात वैनगंगा व बाघ या महत्वाच्या नद्या असून या ठिकाणी संदेशवहन यंत्रणा अद्ययावत ठेवण्याच्या सूचना त्यांनी दिल्या. नेमून दिलेली जबाबदारी प्रत्येक विभागाने पार पाडणे अनिवार्य असून मान्सून काळात आपत्ती व्यवस्थापन कक्षाशी नियमीत संपर्क ठेवावा असे त्यांनी सांगितले. पूर ओसरल्यावर साथरोग वाढण्याची शक्यता असते, ही बाब लक्षात घेता आरोग्य विभागाने आतापासूनच नियोजन करणे आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले. प्रत्येक तालुक्यातील आपत्ती व्यवस्थापन समितीची बैठक घ्यावी असे निर्देश दिले.

पावसाळ्यात बस वाहून गेली, कार वाहून गेली, नागरिक पुरात अडकले व रेल्वे रुळावर पाणी साचले अशा घटना प्रत्येक वर्षी घडत असतात. हा जुना अनुभव लक्षात घेता या घटना घडणार नाहीत यासाठीच्या उपाययोजना आतापासूनच कराव्यात असे जिल्हाधिकारी यांनी सांगितले. मागील आपत्तीचा अनुभव व त्याचा अभ्यास करुन उपाययोजना कराव्या असे ते म्हणाले. पूर परिस्थितीच्या काळात डोंगा उलटून जिवित हानी झाल्याच्या घटना घडतात ही बाब लक्षात घेता पुराच्या काळात डोंग्याला प्रतिबंध घालण्यात यावा असे त्यांनी सांगितले.

सर्व यंत्रणांनी पूरपरिस्थिती व आपत्तीच्या काळात समन्वय ठेवून काम करावे तसेच दिलेल्या जबाबदारीचे गांभीर्याने पालन करावे असे निवासी उपजिल्हाधिकारी स्मिता बेलपत्रे यांनी सांगितले. त्यांनी प्रत्येक विभागाला जबाबदारीचे वाटप करुन दिले. प्रत्येक तालुका स्थळी नियंत्रण कक्ष स्थापन करण्याच्या सूचना दिल्या. संपर्क तुटणाऱ्या गावांना उपविभागीय अधिकारी व तहसीलदार यांनी भेटी देऊन नागरिकांना माहिती द्यावी असे त्यांनी सांगितले.

# रानटी हत्तींचे गोंदिया जिल्ह्यात पुनरागमन



**गोंदिया :** गेल्या वर्षी जिल्ह्यात धूमाकुळ घातलेल्या रानटी हत्तींच्या कळपाने पुनरागमन केले आहे. बुधवार, २६ एप्रिल रोजी अर्जुनी मोरगाव तालुक्यातील पळसगाव ते सर्रेगाव परिसरात सायंकाळी एका गुराख्याला हत्तींचा कळप दिसला.तालुक्यातील मलकाझरी परिसरात २६ एप्रिल रोजी पुनरागमन झाले.हा परिसर राष्ट्रीय उद्यानात येतो. तेव्हापासून हा कळप त्याच परिघात मार्गक्रमण करत आहे.सध्या तो रामपुरी परिसरात दाखल झाला आहे. रात्री वाट मिळेल तसा प्रवास होतो. त्यामुळे शेतपीक पायदळी तुडविल्याने नुकसान होत आहे. शुक्रवारी रात्री रामपुरी येथील राजकुमार हरिचंद सलामे,जेनलाल परसराम वाढई व सुदाम बाला सलामे यांच्या शेतात नुकसान केल्याची माहिती आहे.त्या नंतर हा कळप पुन्हा राष्ट्रीय उद्यान क्षेत्रातच येऊन स्थिरावला आहे.

मागील वर्षी ऑक्टोबर महिन्यात रानटी हत्तींचा कळप गडचिरोली जिल्ह्यातून गोंदिया जिल्ह्यात दाखल झाला होता. नवेगावबांध वन परिक्षेत्रांतर्गत कवठा जंगल परिसरात रानटी हत्तींनी बस्तान मांडले होते. याच कालावधीत हत्तींच्या कळपाने एका आदिवासी शेतकऱ्याला ठार केले होते. जवळपास १५ दिवस या परिसरात धुमाकूळ घातल्यानंतर नांगलडोह येथील आदिवासींच्या वस्तीवर हल्ला करुन त्यांच्या घराची व इतर जीवनोपयोगी साहित्याची नासधूस करत हत्तींचा कळप गडचिरोली जिल्ह्याच्या दिशेने वळला होता. त्यानंतर रानटी हत्ती दूर निघून गेले होते.

२१ एप्रिल रोजी या हत्तींचे लोकेशन गोंदिया व गडचिरोली जिल्ह्याच्या सीमेवरील गडचिरोली जिल्ह्यातील पुराडा वनपरिक्षेत्र, रामगड बीटमध्ये दिसून आले होते. बुधवारी सायंकाळी हत्तींच्या कळपाने जिल्ह्याची सीमा ओलांडली असून सध्या हे हत्ती जिल्ह्यातील पळसगाव व सर्रेगाव शिवारात असल्याची माहिती आहे. सावधगिरी म्हणून वनविभागाने नवेगाव बांध उद्यान आणि बसबोडन गावात अलर्ट जारी केला आहे. रानटी हत्तींच्या पुनरागमनामुळे शेतकऱ्यांमध्ये पुन्हा दहशत पसरली आहे. हत्तीच्या कळपाची हालचाल व धोका लक्षात घेऊन वनविभागाच्या सर्व अधिकारी, कर्मचाऱ्यांनी पथकांसह सावध राहण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत, अशी माहिती नवेगावबांधचे सहाय्यक वनसंरक्षक दादा राऊत यांनी दिली.